जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८०२ दिनांक - ११/११/२०२३**

खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर

## जबरी चोरी करणारे आरोपी खडकी पोलीस स्टेशनकडुन जेरबंद

फिर्यादी ह्या दिनांक ३०/१०/२०२३ रोजी १४.३० वा.चे सुमारास त्यांचे कार्यालयासमोर पायी चालत जात असताना स्कुटर वरुन आलेल्या दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचे गळ्यातील सोन्याचे मणी मंगळसुत्र हात घालुन हिसका मारुन तोडून नेले.सदर बाबत अनोळखी इसमांविरुध्द खडकी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.४०१/२०२३ भा.द.वि.कलम.३९२,३४ अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर घटनेची तात्काळ दखल घेवुन यातील अनोळखी आरोपीचा शोध घेणेकामी तपासपथक प्रभारी पोलीस उप निरीक्षक वैभव मगदुम,श्रेणी पोलीस उप निरीक्षक,तानाजी कांबळे, व तपासपथक स्टाफ यांनी तांत्रिक विश्लेषणा व्दारे आरोपी निष्पन्न करुन दाखल गुन्ह्यातील आरोपी नामे, **१)** राहुल मच्छिंद्र कांबळे, वय २४ वर्षे,रा.पुणे **२)** योगेश ऊर्फ सॅम जगदिश सोनवणे, वय २३ वर्षे, रा.पुणे यांना अटक करुन दाखल गुन्ह्यातील चोरीस गेले सोन्याचे मंगळसुत्र आरोपीकडुन हस्तगत करण्यात आले असुन दाखल गुन्ह्या करतेवेळी वापरलेली अँक्सेस मोपेड आरोपीकडुन जप्त करण्यात आलेली असुन सदर गाडी ही कोथरुड पोलीस स्टेशनकडील चोरीतील असल्याचे निष्पन्न झाले आहे.दाखल गुन्ह्यातील आरोपी यांचेवर यापुर्वी पुणे शहर पोलीस आयुक्तालयात शरिराविरुध्दचे व मालमत्तेविरुध्दचे अनेक गुन्हे नोंद आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर, श्री.रंजनकुमार शर्मा मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ०४,पुणे शहर,श्री.शशिकांत बोराटे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,खडकी विभाग,पुणे शहर श्रीमती आरती बनसोडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर,श्री. राजेंद्र सहाणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.मानसिंग पाटील,यांचे मार्गदर्शनाखाली, तपासपथकाचे पोउप निरीक्षक वैभव मगदुम, श्रेणी पोलीस उप निरीक्षक तानाजी बबन कांबळे, पो.अमंलदार.कलंदर निकाळजे, जहांगिर पठाण, अनिकेत भोसले,ऋषिकेश दिघे,प्रताप केदारी,यांनी केलेली आहे.

